## महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

# महा-मेट्रोच्या मोफत महा कार्ड मोहिमेमुळे रोखरहित प्रवासास प्रोत्साहन

## ९००० हून अधिक विध्यार्थ्यांना महा कार्डचे वितरण, डिजिटल व्यवहार ५५% पर्यंत वाढले




नागपूर : विद्यार्थ्यांना रु.२०० रिचार्जवर मोफत महा कार्ड देण्यासाठी महा-मेट्रोने मोहिम सुरू केली होती. ही मोहीम अत्यंत यशस्वी ठरली असून, महा-मेट्रोच्या कर्मचाऱ्यांनी प्रवाशांना डिजिटल प्रवासाच्या माध्यमांकडे वळवण्यासाठी घेतलेली मेहनत मुख्य कारण ठरली. या उपक्रमामुळे डिजिटल इंडियाच्या दिशेने महा-मेट्रोची बांधिलकी अधिक दृढ झाली आहे.

या मोहिमेअंतर्गत, २५ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीत एकूण ९०७१ महा कार्ड वितरित करण्यात आले. तसेच ३ ते ३० सप्टेंबर या कालावधीत १७७ पदव्युत्तर विद्यार्थ्यांना महा कार्ड देण्यात आले.

या उपक्रमामुळे रोखरहित व्यवहारांना अधिक चालना मिळाली आहे. सध्या एकूण व्यवहारांपैकी ५५% व्यवहार डिजिटल स्वरूपात होत असून, महा कार्ड धारकांचे एकूण प्रवाशांतील योगदान ३३% इतके आहे. सध्याच्या शैक्षणिक सत्रात विद्यार्थी प्रवासी संख्येत २२% वाढ नोंदविल्या गेली आहे.नागपूर मेट्रोचा वापर करून प्रवाशांना केवळ डिजिटल तिकीट सुविधेचा लाभ मिळत नाही, तर हा प्रवास सुरक्षित, आरामदायक, परवडणारा, विश्वासार्ह आणि पर्यावरणपूरक असल्यामुळे विद्यार्थ्यांसह सर्व नागरीकांचा हा पहिला पसंतीचा पर्याय बनत चालला आहे..